**D**
**Batch 2016-19**

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## बी. ए. – (विशारद) सामाजिकशास्त्रे/ योग

**परीक्षा : मे – २०२२**

**प्रथम वर्ष**

**सत्र – १**

**विषय:– व्यावहारिक मराठी (BAM- 101)**

**दिनांक :** २७/०५/२०२२ **गुण :** ६० **वेळ :** दु. २.०० ते. दु. ४.३०

**सूचना :**
१. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२. उजवीकडील अंक त्या प्रश्नांचे गुण दर्शवितात.
३. उत्तरपत्रिकेत प्रश्नपत्रिकेतील प्रश्नक्रमांक लिहिणे आवश्यक आहे.

**प्र.१. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.** (२०)

१. भारतः संतांची भूमी
२. ग्रामीण स्त्री
३. नदीचे आत्मवृत्त
४. मोबाईलः शाप की वरदान
५. माझा आवडता नेता

**प्र.२.अ) खालीलपैकी एका विषयावर पत्रलेखन करा.** (१०)

१. तुमच्या गावातील घराची लाईट रोज ८ ते १० तास जाते. त्यामुळे तुमच्या शेतीचे नुकसान होते. याबाबत तक्रार अर्ज विद्युत महामंडळाला लिहा.

**किंवा**

२. कौटुंबिक कारणासाठी तुम्ही १० दिवस कॉलेजमध्ये हजर राहू शकत नाही. त्याबाबत प्राचार्यांकडून मान्यता घेण्यासाठी अर्ज लिहा.

**किंवा**

३. 'शिपाई' या पदासाठी करावयाचा अर्ज लिहा.

**ब) इतिवृत्ताचा नमुना तयार करा. (कोणत्याही एक)** (१०)

१. 'हनुमान मित्र मंडळ', पुणे यांची वार्षिक सभा गुरूवार, १० जानेवारी २०१९ ला झाली. त्याचे इतिवृत्त तयार करा.

**किंवा**

२. बी.ए. सामाजिकशास्त्रे माहिती पत्रकाचा नमुना तयार करा.

**प्र.३. चित्रफितीसह जाहिरात लेखन करा. (कोणत्याही दोन विषयावर) (१०)**

१. पी.एन.जी.
२. ए.ई.डी सॅमसंग कंपनीची जाहिरात
३. अंजनी साडी सेल
४. महिंद्रा ट्रॅक्टर

**प्र.४. खालील उताऱ्याचा सारांश लिहून योग्य शीर्षक द्या. (१०)**

सोशल मीडियाची क्रेझ सुरू झाली. तेव्हा मोठ्या प्रमाणात युवावर्ग त्याकडे आकर्षित झाला. नव्या जगाचे तंत्रज्ञान म्हणून या माध्यमांकडे आकर्षित होणे स्वाभाविक होते, पण आज हे माध्यम अनेक तरूणांना नैराश्याच्या गर्तेत लोटत आहे. चिडचिड वाढणे, छातीत धडधडणे, हातापायाला घाम येणे, आत्मविश्वास कमी होणे अशा तक्रारी घेऊन मानसोपचार तज्ज्ञांकडे येणाऱ्या तरूणांचे प्रमाण वाढते आहे. सतत ऑनलाईन राहिल्यामुळे प्रत्यक्ष नात्यातील संवाद कमी होणे, तुलना केल्याने न्यूनगंड निर्माण होणे, चिडचिड वाढणे, एकटेपणा जाणवण्याच्या तक्रारीही नोंदवल्या जात आहेत. मागील पाच वर्षात मुंबईकरांमध्ये ताणतणावांमुळे नैराश्यांचे प्रमाण वाढीस लागले आहे. त्यात महिला आणि तरूण वर्गाचा समावेश सर्वाधिक आहे. इतर अनेक कारणांसोबत सोशल मीडियाच्या वापरामुळे तरूणामध्ये निराशा वाढली आहे असे मत मानसोपचारतज्ज्ञ नोंदवितात.